# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महापालिका प्रभाग क्रमांक 5 कार्यक्षेत्रात मान्सून पूर्व डीप क्लीन ड्राईव्ह या मोहिमेला सुरुवात**

मिरा भाईंदर, दि. 09 मे 2025

स्वच्छ भारत अभियान आणि राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात “मान्सूनपूर्व डीप क्लिन ड्राईव्ह”ही विशेष स्वच्छता मोहीम मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या राबविण्यात आली.

सध्या आपला भारत देश आणि पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे एक स्मरण म्हणून शहीद मेजर कौस्तुभ राणे यांच्या स्मारकापासून या मान्सून पूर्व डीप क्लीन ड्राईव्ह मोहिमेची सुरूवात झाली. सकाळी 8 वाजता स्मारकाजवळ एकत्र जमून सगळ्यांनी सामूहिक स्वच्छता शपथ घेतली. त्यानंतर मा. आयुक्तांच्या हस्ते फायर गाडीच्या साहाय्याने स्मारकाची स्वच्छता करण्यात आली. यावेळी मिरारोड रेल्वे स्थानक परिसरात आणि प्रभाग समिती 5 अंतर्गत विविध ठिकाणी व्यापक स्वच्छता उपक्रम हाती घेण्यात आले.

प्रभाग समिती 5 मधील स्वच्छता मोहिमेची रचना पुढीलप्रमाणे होती:

टीम 1 – मिरारोड रेल्वे स्टेशन परिसर

टीम 2 – आय्यप्पा मंदिर बॅकलेन ते जॉगर्स पार्क, स्मशानभूमी

टीम 3 – MBMT बस स्टॉप ते रसाज सर्कल

टीम 4 – रसाज सर्कल ते युनियन बँक, नयानगर पोलीस चौकी ते हैदरी चौक

प्रत्येक टीमने आप-आपल्या क्षेत्रात अंतर्गत रस्त्यांची व दुभाजकांची स्वच्छता, बस स्टॉप स्वच्छता, शौचालय स्वच्छता, पुतळे धुणे, नाल्यांची सफाई, स्टिकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदीवर कारवाई, चेंबर झाकणे बदलणे अशी विविध स्वच्छतेची कामे उत्साहात पार पडली.

सदर "मान्सूनपूर्व डीप क्लीन ड्राईव्ह" मोहिमेमध्ये प्रभाग समिती क्र. ५ मधील एकूण ५.५ किलोमीटर मुख्य व अंतर्गत रस्ते यांची साफसफाई करण्यात आली. ७००० Kg डस्ट माती रॅबिट साफ करण्यात आली, २५०० Kg सुका कचरा गोळा करण्यात आला. रस्त्यालगतच्या झाडांची छाटणी करून २५०० kg कचरा गोळा करण्यात आला. सदर मोहिमे दरम्यान एकूण धुंकलेल्या जागा साफ करण्यात आल्या ६५ जागी चिटकवण्यात आलेले स्टिकर्स साफ करण्यात आले.सदर मोहिम दरम्यान शहरांमध्ये रस्त्यावर अस्वच्छता पसरवणाऱ्या आस्थापनेवर तसेच सिंगल युज प्लास्टिक वापर करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात आली आहे.

ही मोहीम केवळ महापालिकेची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची आहे. म्हणूनच मिरा भाईंदर महापालिकेच्या वतीने मा. आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रत्येक रहिवाशाने आपल्या सोसायटी, कार्यालय, शाळा, महाविद्यालय आणि परिसराची जबाबदारी स्वीकारून मान्सूनपूर्व स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभागी व्हावे. तसेच "स्वच्छ मिरा भाईंदर, सुंदर मिरा भाईंदर" या ध्येयाने प्रेरित होऊन आपण सर्वांनीच स्वच्छतेच्या मोहिमेत एकत्र यावे, असे आवाहन मा. आयुक्तांनी नागरिकांना केले.

या यशस्वी मोहिमेच्या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, प्र.अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) श्रीमती कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दीपक खांबीत, अग्निशमन दल अधिकारी, सर्व सहाय्यक आयुक्त, स्वच्छता निरीक्षक , अधिकारी व सफाई कर्मचारी उपस्थित होते.